कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८९ /२०२६ दि. २३/०४/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रातील कोपरी वाहतुक उपविभागाने हद्दीत दि. १४/०४/२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जंयती निमित्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर मिरवणुक ही गांधीनगर येथुन निघुन कोपरी अष्ठविनायक चौक येथे समाप्त होणार असुन मिरवणुकीत मोठया प्रमाणात अनुयायी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे कोपरी सर्कल ते ठाणे रेल्वे स्टेशन रोड पुर्व परीसरात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणची वाहतूक सुनिश्चित व सुरक्षीत राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद – **१)** गोखले रोड, बी कॅबिन, गुरुव्दारा सर्व्हिस रोड, ज्ञानसाधना कॉलेज रोडने कोपरी सर्कल मार्गे ठाणे रेल्वे स्टेशन पुर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना तसेच टी.एम.टी., एन.एम.एम.टी. बेस्ट व खाजगी बसेस यांना **कोपरी सर्कल** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने कोपरी सर्कल येथे उजवे वळण घेवुन फॉरेस्ट नाका येथुन कृष्णा बोरकर रोडने ठाणेकर वाडी मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच टी.एम.टी., एन.एम.एम.टी. बेस्ट व खाजगी बसेस या प्रवाशांना कोपरी सर्कल येथे सोडुन व तेथुन प्रवाशांना घेवुन इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद **२)** आनंद नगर, गांधी नगर गावातुन तसेच हरिओम नगर सर्व्हिस रोडने कोपरी सर्कल मार्गे ठाणे रेल्वे स्टेशन पुर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपरी सर्कल** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग सदरची वाहने कोपरी सर्कल येथे उजवे वळण घेवुन फॉरेस्ट नाका येथुन कृष्णा बोरकर रोडने ठाणेकर वाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **३)** हरिओम नगर कट येथुन फॉरेस्ट नाका मार्गे ठाणे रेल्वे स्टेशन पुर्वकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **फॉरेस्ट नाका** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने फॉरेस्ट नाका येथुन कृष्णा बोरकर रोडने ठाणेकर वाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना **दि. १४/०४/२०२६ रोजी सायंकाळी १८:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पर्यंत** अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/वसई/मिरा भाईंदर महानगरपालिका.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग ठाणे.